विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला,
नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ: - १. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. २८/११/२०१६

२. शुध्दीपत्रक क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ दि. ३०/११/२०१६.

## कार्यालयीन आदेश

क्र.-विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६, मुंबई दि. 21 DEC 2016

उपरोक्त संदर्भ क्र. १ मधिल आदेशान्वये विक्रीकर अधिकारी व सहायक विक्रीकर आयुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्द नव्याने दाखल करावयाची अपीले त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर उपायुक्तांकडे तर विक्रीकर उपायुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्द नव्याने दाखल करावयाची अपीले त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर सहआयुक्त यांचेकडे दाखल करण्यात यावीत असे निर्देश देण्यात आले होते. या निर्देशाची अंमलबजावणी दि. ०१/१२/२०१६ नंतर दाखल होणाऱ्या अपिलांबाबत करण्यात यावी असे संदर्भ क्र. २ मधिल शुध्दीपत्रकामध्ये स्पष्ट करण्यात आले होते. या बदललेल्या अपिल कार्यपध्दतीच्या संबंधात खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. प्रशासकीय परिपत्रक क्र. JCST/HQ-7/ Restructuring/ Adm Instructions /2015/No.01 Dt. 07.12.2015 नुसार विक्रीकर विभागामध्ये कार्यनिहाय शाखांऐवजी भौगोलीक प्रशासकीय शाखा अस्तित्वात आल्या आहेत. हे करत असतांना विक्रीकर विभागातील कामाची व मनुष्यबळाची फेररचना करण्यात आलेली आहे. त्यानुसार एका व्यापाऱ्याचे प्रकरण एका अधिकाऱ्यास नेमून देण्यात आले आहे. त्यामुळे निर्धारणा / वैधानिक आदेश ज्या अधिकाऱ्याने पारित केला त्याच्याचकडे त्या व्यापाऱ्याचे प्रकरण न राहता दुसऱ्या अधिकाऱ्याकडे सर्व प्रलंबीत कार्यवाहीसाठी स्थानांतरीत झाले आहे. त्यामुळे अपिल दाखल करतांना ते ज्या अधिकाऱ्याने निर्धारणा / वैधानिक आदेश पारित केला होता त्याच्या नियंत्रक विक्रीकर उपआयुक्त / विक्रीकर सहआयुक्त यांच्या कडे अंशत: भरणा नक्की करण्यासाठी दाखल करावे की सध्या ज्या अधिकाऱ्यास त्या व्यापाऱ्याचे प्रकरण स्थानांतरीत झाले आहे त्या अधिकाऱ्याच्या नियंत्रक विक्रीकर उपआयुक्त / विक्रीकर सहआयुक्त यांच्या कडे दाखल करावे या बाबत संदिग्धता निर्माण झाली आहे. त्या बाबत असे स्पष्ट करण्यात येते की, निर्धारणा / वैधानिक आदेशाविरुध्द अपिल दाखल करते वेळी व्यापाऱ्याचे प्रकरण ज्या अधिकाऱ्याकडे नेमून दिले आहे त्याच्या नियंत्रक विक्रीकर उपआयुक्त / विक्रीकर सहआयुक्त यांच्या कडे अंशत: भरणा नक्की करण्यासाठी अपिल दाखल करण्यात यावे.

२. ज्या अपिल प्रकरणांमध्ये स्थगिती आदेश देणे अद्यापही बाकी आहे अशा सर्वच प्रकरणांमध्ये कालबध्द मर्यादेमध्ये विहीत कार्यपध्दती नुसार स्थगिती आदेश प्राधान्याने जारी करण्याच्या सुचना सर्व अपिल प्राधिकाऱ्यांना [विक्रीकर उपआयुक्त (अपिल)/ विक्रीकर सहआयुक्त (अपिल)] यांना देण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात सर्व अपर विक्रीकर आयुक्त यांना निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील विक्रीकर सहआयुक्त (अपिल) यांच्या कडील स्थगिती आदेश जारी करणे बाकी असलेल्या अपिल प्रकरणांचा तातडीने आढावा घ्यावा. सदर आढावा घेतल्यानंतर त्या अपिल प्रकरणांमध्ये स्थगिती आदेश लवकरात लवकर जारी व्हावेत यासाठी त्या प्रकरणांचे वाटप अपर विक्रीकर आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील विक्रीकर सहआयुक्त (नोडल विभाग) यांना सम प्रमाणात करावे.

३. अपिल प्रकरणांत कालबध्द मर्यादेमध्ये विहीत कार्यपध्दती नुसार स्थगिती आदेश प्राधान्याने जारी करण्याची दक्षता सर्व विक्रीकर सहआयुक्त (अपिले), विक्रीकर उपआयुक्त (अपिले) तसेच नियंत्रक विक्रीकर उपआयुक्त / विक्रीकर सहआयुक्त यांनी घ्यावी.

विक्रीकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

१. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर विक्रीकर आयुक्त, मुंबई- १, २, ३, ४/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.
४. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
५. आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. सर्व विक्रीकर उपायुक्त, सहायक विक्रीकर आयुक्त आणि विक्रीकर अधिकारी.
७. सर्व आस्थापना अधिकारी.
८. निवडनस्ती.
९. स्थळप्रत.